महासागर
रविवार, दि. 25 जानेवारी 2026
अमरावती
पान 3

# जनसंवाद कार्यक्रमात 74 नागरिकांचे निवेदने प्राप्त

## पालकमंत्र्यांचा नागरिकांशी थेट संवाद

**अमरावती** - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना आज विश्रामगृह येथे जनसंवाद कार्यक्रमात विविध क्षेत्रातील समस्याबाबत नागरिकांनी निवेदने सादर केली. आजच्या कार्यक्रमात जिल्ह्याभरातून 74 निवेदने प्राप्त झालीत. यावेळी त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. पालकमंत्री बावनकुळे यांनी नागरिकांच्या समस्या आणि तक्रारी यावेळी जाणून घेतल्या.

यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस अधीक्षक विशाल आनंद यावेळी उपस्थित होते. जनसंवाद कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालकमंत्री यांना प्राप्त झालेले निवेदने त्यांनी संबंधित विभागाकडे देऊन त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले. वीज बिल, मालकी पट्टे, रस्ते, नोकरी, कृषी, शेतकरी आत्महत्या, घरकुल, रस्ते, पाणी, क्रीडा, आरोग्य, बांधकाम या विविध विषयांवरील निवेदने प्राप्त झाली. अनेक नागरिक वैयक्तिक समस्यांची निवेदने घेऊन जनसवांद कार्यक्रमात आले. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी नागरिकांच्या संबंधित निवेदनांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनातील अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# डीपीडीसी निधी खर्चाला कासवगती

**23 टक्के रक्कम तशीच शिल्लक ■ 2026-27 साठी 1,200 कोटींच्या तरतुदीचा प्रस्ताव, शेती, पाणी आणि रस्ते विकासावर सरकारचा भर**





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.24)** - जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) निधीच्या वापराबाबत प्रशासनाची कामगिरी समाधानकारक नसल्याचे चित्र समोर आले आहे. सन 2025-26 या आर्थिक वर्षात मिळालेल्या निधीपैकी तब्बल 23 टक्के रक्कम अद्याप खर्च न झाल्याने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना कामाच्या गतीत वाढ करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या डीपीडीसी बैठकीत जिल्ह्याच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या वेळी पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, सन 2026-27 साठी जिल्ह्यासाठी 1,200 कोटी रुपयांच्या निधीची मागणी राज्य शासनाकडे करण्यात येणार असून त्यामध्ये कृषी विकास, जल पुनर्भरण आणि रस्ते विकासाला प्राधान्य दिले जाणार आहे.

सन 2025-26 मध्ये जिल्ह्यासाठी 733.40 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी 440.04 कोटी रुपये निधी मंजूर झाला. मात्र आजअखेर फक्त 337.79 कोटी रुपये खर्च झाले असून उर्वरित 102 कोटींहून अधिक निधी अखर्चित आहे. निधी वेळेत खर्च न झाल्यास पुढील वर्षीच्या तरतुदींवर परिणाम होतो, असे स्पष्ट करत पालकमंत्र्यांनी सर्व विभागांना कामे तातडीने मार्गी लावण्याचे आदेश दिले.

मंजूर प्रकल्पांच्या निविदा प्रक्रिया त्वरित पूर्ण करून मार्च 2026 पूर्वी संपूर्ण निधी खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे निर्देश देण्यात आले. विकासकामांमध्ये दिरंगाई, निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

बैठकीस खासदार, आमदार, जिल्हाधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. निधीच्या वापरात पारदर्शकता, कामांची गुणवत्ता आणि वेळेत पूर्तता यावर विशेष लक्ष देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

### डिसेंबर 2025 पर्यंत निधी खर्चाचा आढावा

| योजना प्रकार | मूळ बजेट | प्राप्त बजेट | खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| आदिवासी क्षेत्राबाहेरील उपाय | 104.40 | 62.64 | 62.64 | 100% |
| अनुसूचित जाती उपयोजना | 102.00 | 61.20 | 32.83 | 54% |
| सर्वसाधारण योजना | 527.00 | 316.20 | 242.32 | 77% |
| एकूण | 733.40 | 440.04 | 337.79 | 77% |

### 2026-27 साठी महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी प्रस्तावित निधी

| | |
|---|---|
| ग्रामीण विकास | : 27.05 कोटी |
| रस्ते विकास | : 38.00 कोटी |
| कृषी व सलग्न सेवा | : 40.92 कोटी |
| आरोग्य | : 72.00 कोटी |
| नगर विकास | : 73.12 कोटी |
| सिंचन व पूर नियंत्रण | : 13.33 कोटी |
| शिक्षण | : 23.64 कोटी |
| तीर्थक्षेत्र, पर्यटन व किल्ले विकास | : 17.48 कोटी |
| ऊर्जा विकास | : 30.60 कोटी |
| महिला व बाल विकास | : 12.39 कोटी |
| सामान्य विकास | : 49.66 कोटी |

### शहर सुरक्षेसाठी एआय-आधारित सीसीटीव्ही जाळे

अमरावती शहराच्या सुरक्षेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी बहुप्रतिक्षित सीसीटीव्ही प्रकल्पाला अखेर गती मिळणार आहे. डीपीडीसी बैठकीत सुमारे 150 कोटी रुपयांच्या खर्चातून एआय-आधारित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. हे कॅमेरे मार्बल बेस कंपनीमार्फत बसविले जाणार असून, संपूर्ण प्रकल्पासाठी नव्याने सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे गुन्हेगारीवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन सुधारणा आणि आपत्कालीन घटनांवर त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

### संत्रा शेतीसाठी स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेती पद्धती सुरू केली जाणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व 'मॅप माय क्रॉप' या एआय आधारित कंपनीमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रणालीद्वारे उपग्रह प्रतिमा, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग व आयओटीच्या माध्यमातून पिकांची निगा, रोग व्यवस्थापन, उत्पादनाचा अंदाज व बाजार नियोजन अधिक अचूक करता येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यासोबतच उत्पन्नातही वाढ अपेक्षित आहे.

### जलसंधारण व ग्रामीण रस्त्यांना चालना

अंजनगावसुर्जी येथील लोकजागर संघटनेच्या सहकार्याने जल पुनर्भरण व पगडंडी मार्ग निर्मितीचे काम हाती घेण्यात येणार आहे. हे प्रकल्प पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेत जोड रस्ता व जल पुनर्भरण योजनेतून राबविले जातील. त्यामुळे भूजल पातळी वाढण्यास, शेतीला पाणीपुरवठा सुधारण्यास आणि ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

### उड्डाणपुलांसाठी मोठी तरतूद प्रस्तावित

अमरावती शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उड्डाणपुलांच्या कामांना गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राजकमल चौक येथील उड्डाणपुलासाठी 125 कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाकडे मागणी स्वरूपात पाठविण्यात येणार आहे. यासोबतच चित्रा चौक ते इतवारा या मार्गावरील उड्डाणपुलासाठीही स्वतंत्र निधी लवकरच मंजूर होण्याची शक्यता असून, या प्रकल्पामुळे शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूक प्रवाह अधिक गतिमान होणार आहे. नागरिकांचा वेळ व इंधन बचत होण्यासह अपघातांचे प्रमाण कमी होण्यासही मदत होणार आहे.

# भाजपच्या सर्वच नगरसेवकांच्या गुडघ्याला महापौरपदाचे बाशिंग

- नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये उत्सुकता
- फुट टाळण्यासाठी पालकमंत्र्यांची समन्वय बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 24)** - सोडतीनुसार अमरावती महापालिकेचे महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव निघाल्याने भाजपच्या सर्वच 25 नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रत्येक नगरसेवकाने जणू महापौरपदाचे बाशिंग आपल्या गुडघ्याला बांधल्याचे चित्र सध्या दिसत आहे. आपणच महापौर होणार, अशा वावड्या समाजमाध्यमे व काही प्रसारमाध्यमांतून पसरवल्या जात असल्याने पक्षांतर्गत चर्चांना वेग आला आहे.

भाजपमध्ये अनुभवी व दोन ते तीन वेळा निवडून आलेले नगरसेवक मोठ्या संख्येने आहेत. त्याचबरोबर काही नवखे नगरसेवकही स्वत:ला महापौरपदाचा प्रबळ दावेदार म्हणून मांडत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवरपक्षात गैरसमज, अस्थिरता व संभाव्य फूट निर्माण होऊ नये, यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वच नवनिर्वाचित नगरसेवकांशी



स्वतंत्रपणे चर्चा करण्यासाठी शनिवारी बैठक आयोजित केली. या बैठकीत पक्षशिस्त, एकजूट आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचा निर्णय अंतिम राहील, असे स्पष्ट संकेत देण्यात आले. तसेच महापालिकेत महायुतीचीच सत्ता स्थापन होईल, याबाबत पालकमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना ठाम विश्वास व्यक्त केला.

महापौरपदासाठीची स्पर्धा स्वाभाविक असली तरी ती पक्षहिताला बाधक ठरू नये, यासाठी नेतृत्वाने वेळेत हस्तक्षेप केल्याने भाजपच्या गोटात समन्वय व स्थैर्य निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# चारचाकी सिमेंटच्या भिंतीवर आदळून चालकाचा जागीच मृत्यू

## वरुड रेल्वे क्रॉसिंगजवळ भीषण अपघात

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.24 )** - वरुड तालुक्यातील राजुरा नाक्याजवळ असलेल्या रेल्वे गेट परिसरात आज सायंकाळी सुमारे पाच वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, मृताच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

या अपघातात सचिन साबळे (रा. छिंदवाडा, मध्य प्रदेश) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो चारचाकी वाहनाने राजुरा बाजार येथून वरुडकडे येत होता. वरुड रेल्वे क्रॉसिंगजवळ अचानक वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याची गाडी थेट रेल्वे गेटलगत असलेल्या सिमेंटच्या भिंतीवर जोरात आदळली. धडक इतकी भीषण होती की वाहनाचा समोरील भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला. या भीषण अपघातात सचिन साबळे याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी



घटनास्थळी धाव घेतली व तत्काळ पोलिसांना कळविण्यात आले. काही वेळातच वरुड पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला व शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी वेग आणि वाहनावरील नियंत्रण सुटणे हे प्राथमिक कारण असावे, असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातामुळे काही काळ राजुरा नाका व रेल्वे क्रॉसिंग परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. या प्रकरणी वरुड पोलीस अधिक तपास करीत असून, घटनेचा सखोल शोध घेण्यात येत आहे.

# टाटा विस्टा वाहनातून गोवंश तस्करी

**मोर्शी पोलीसांनी 6 जनावरांचे वाचविले प्राण, 3.36 लाखांचा मुद्देमाल जप्त**





**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.24 )** - गोवंशांची अवैध वाहतूक आणि कत्तलीसाठी नेण्याच्या वाढत्या प्रकारांवर मोर्शी पोलिसांनी मोठा आघात केला आहे. पांढऱ्या रंगाच्या टाटा इंडिगो कारमधून निर्दयपणे कोंबून नेल्या जात असलेल्या सहा गोवंशांची पोलिसांनी सुटका केली असून, सुमारे 3 लाख 36 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई 23 जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास हिवरखेड ते लोणी मार्गावर करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यप्रदेशकडून गोवंशांची तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार जयस्तंभ चौक परिसरात नाकाबंदी करण्यात आली. यावेळी संशयास्पद टाटा इंडिगो कार (एम.एच. 02 सी.एच. 3517) थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन मागे घेत वेगाने हिवरखेडमार्गे लोणीकडे धाव घेतली. पोलिसांनी पाठलाग करून काही अंतरावर वाहन अडविले. मात्र, आरोपींनी सुमारे शंभर फूट अंतरावर गाडी सोडून अंधाराचा फायदा घेत पलायन केले. कारची तपासणी केली असता त्यामध्ये गाय व कालवड अशा सहा जनावरांना अतिशय अमानुषपणे कोंबले असल्याचे निदर्शनास आले. तत्काळ पशुधन विकास अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणी करून जनावरांना प्राथमिक उपचार, चारा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर त्यांना येरला येथील गोशाळेत सुरक्षितरीत्या हलविण्यात आले. या प्रकरणी मोर्शी पोलिस ठाण्यात गोवंश संरक्षण व प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली. पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम राबविण्यात आली. आरोपींचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून तपास वेगाने सुरू आहे.

### गोवंश तस्करीविरोधात कठोर कायद्याची मागणी

महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात असतानाही मध्यप्रदेशातून छुप्या मार्गाने गोवंशांची मोठ्या प्रमाणावर तस्करी सुरू असल्याबद्दल गोरक्षक संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अवैध वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर जप्ती, चालक व सूत्रधारांवर कठोर कारवाई, तसेच तस्करीसाठी स्वतंत्र व अधिक कडक कायदेशीर तरतुदी करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. गोवंश संरक्षणासाठी पोलिस, पशुसंवर्धन विभाग आणि सीमावर्ती तपास यंत्रणांमध्ये अधिक समन्वयाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# अस्तित्वाच्या लढाईत खोडकेंची राणांविरुद्धची तलवार म्यान?

## पक्षश्रेष्ठींच्या आदेशानंतर राष्ट्रवादी सत्तास्थापनेचा भाग बनणार?

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 24)** - 'काहीही झाले तरी रवी राणांसोबत सत्तेत जाणार नाही,' अशी ठाम भूमिका घेणारे राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके यांनी आता पक्षश्रेष्ठींच्या आदेशानंतर आपली भूमिका नरमावल्याचे चित्र आहे. राणांविरुद्ध उघडपणे भूमिका घेणाऱ्या खोडकेंनी तलवार म्यान केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

दोन दिवसांपूर्वी दैनिक महासागरला दिलेल्या प्रतिक्रियेत खोडके यांनी 'पक्षश्रेष्ठी



जो निर्णय घेतील, त्यास आम्ही मान्य करू,' असे सूचक वक्तव्य केले होते. त्यानंतर त्यांच्या भूमिकेत बदल झाल्याचे संकेत मिळत आहेत. दुसरीकडे काँग्रेसच्या गोटातून राष्ट्रवादी सत्तास्थापनेत सहभागी होणार नसल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. त्यामुळे काँग्रेस, एमआयएम व राष्ट्रवादी युतीतून सत्ता स्थापन होण्याची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे.

भाजपला सत्तास्थापनेसाठी लहान पक्षांचे पाठबळ आवश्यक आहे. अशा स्थितीत संजय खोडके भाजपसोबत गेले, तर सत्तास्थापनेचा मार्ग सुकर होऊ शकतो. महापालिका निवडणुकीतील अपयशानंतर पक्षश्रेष्ठींची मर्जी राखणे खोडकेंसाठी अपरिहार्य ठरत असल्याचेही राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

### स्पा सेंटरवरील तरुणीला चाकू दाखवून दिली धमकी

**अमरावती** - अमरावती-बडनेरा रोडवरील गोपालनगर चौकाजवळच असणार्या 'द लक्झरीअस स्पा वेलनेस सेंटर' येथे संशयास्पद प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली.

# 'सलोखा' योजनेला 2027 पर्यंत मुदतवाढ; जमिनीच्या वादांवर तोडगा

## नाममात्र शुल्कात शेतजमिनीची कायदेशीर अदलाबदल शक्य

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 24)**- शेतजमिनीच्या ताबा व वहिवाटीवरून वर्षानुवर्षे सुरू असलेल्या वादांना कायमचा तोडगा देणारी राज्य सरकारची 'सलोखा योजना' आता 1 जानेवारी 2027 पर्यंत सुरू राहणार आहे. शासनाने दिलेल्या या मुदतवाढीमुळे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अत्यल्प शुल्कात जमिनीची कायदेशीर अदलाबदल करता येणार असल्याने न्यायालयीन खटले, खर्च आणि मानसिक तणावातून शेतकरी मुक्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी प्रत्यक्ष ताबा एका शेतकऱ्याकडे आणि कागदोपत्री मालकी दुसऱ्याच्या नावावर अशी स्थिती आढळते. यामुळे शेती करताना अडचणी, कर्ज मिळण्यात अडथळे, तसेच वारंवार वाद व तंटे निर्माण होतात. अशा परिस्थितीत 'सलोखा' योजना शेतकऱ्यांसाठी प्रभावी उपाय ठरत आहे.

या योजनेअंतर्गत केवळ 1,000 रुपये नोंदणी शुल्क आणि 1,000 रुपये मुद्रांक शुल्क भरून शेतजमिनीची कायदेशीर अदलाबदल करता येते. महागड्या नोंदणी शुल्काची अडचण दूर झाल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न सोडवणे आता सोपे झाले आहे.

सलोखा योजनेमुळे न्यायालयीन प्रक्रिया टाळून थेट प्रशासकीय स्तरावरच तोडगा काढता येतो. तहसील कार्यालयामार्फत कागदपत्रांची तपासणी करून दोन्ही पक्षांच्या संमतीने जमिनीची अदलाबदल नोंदवली जाते. त्यामुळे वेळेची बचत, पैशांची बचत आणि सामाजिक सलोखा या तिन्ही गोष्टी साध्य होत आहेत.

जमिनीच्या वादांमुळे अनेकदा कौटुंबिक तणाव, सामाजिक मतभेद आणि गंभीर संघर्ष उद्भवतात. सलोखा योजनेतून परस्पर संमतीने प्रश्न सुटत असल्याने अशा घटनांना आळा बसण्यास मदत होणार आहे. प्रशासनाने या संधीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

> शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करून आपल्या जमिनीवरील हक्क कायदेशीररित्या निश्चित करून घ्यावेत. या योजनेमुळे वाद कमी होतील आणि ताबा सुरक्षित होईल.
>
> **विजय लोखंडे, तहसीलदार, अमरावती**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन:** मौजे गावठाण अमरावती, प्रगणे-बडनेरा, नझुल शिट क्रं. 68-D, नझुल प्लॉट क्रं. 76/1-B, 77/1-B, (पीआर कार्ड नुसार प्लॉट क्रं. 76/1-B), ग्राऊंड फ्लोवर वरील दुकान क्रं. 15 आणि पहिल्या मजल्यावरील दुकान क्रं. 22, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे मनीष प्रदीप कंजवाणी आणि तरुण प्रदीप कंजवाणी हे नरेंद्रसिंह हरनामसिंह अरोरा यांच्या कडून विकत घेण्याचा सौंदा झालेला आहे. तदनंतर, मनीष प्रदीप कंजवाणी आणि तरुण प्रदीप कंजवाणी यांनी ADITYA BIRLA HOUSING FINANCE LIMITED, येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत दि. 22/02/1980 रोजीचे दस्त क्र. 582 हे मुळ खरेदी खत नरेंद्रसिंह हरनामसिंह अरोरा यांच्याकडून गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

कोर्ट शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745

# बनावट टॅगवर गोवंश कत्तलीला उधाण

## जिल्ह्याभरात बनावट टॅगवर तस्करी सुरूच | पोलीस, पशुसंवर्धन व बाजार समितीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.24 )**- गोवंशाची कत्तल रोखण्याकरिता पशुसंवर्धन विभागाने ओळख पटविण्याकरिता टॅग पध्दतीचा अवलंब करण्यात होता. मात्र आता गोवंश तस्करांनी बनावट टॅग तयार करुन गोवंशाची कत्तलीसाठी तस्करी सुरु केली आहे. या प्रकारामूळे टॅगची योग्य तपासणी होत नसल्याचे पुढे आले आहे. त्यामूळे पोलीस, पशुसंवर्धन व बाजार समितीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



अमरावती जिल्ह्यात गोवंश संरक्षणाच्या नावाखाली टॅग लावण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात हे टॅग गोवंशाच्या सुरक्षेसाठी नसून तस्करांसाठी 'परवानगीपत्र'ठरत असल्याचे गंभीर वास्तव समोर येत आहे. बनावट टॅगच्या आधारे गोवंशाची खरेदी-विक्री, वाहतूक आणि अखेरीस कत्तल सुरू असतानाही संबंधित यंत्रणा केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

चांदूर रेल्वे पोलिसांनी दोन वेळा गोवंश तस्करीची प्रकरणे उघडकीस आणली असली, तरी अमरावतीला लागून असलेल्या मध्यप्रदेश सीमेवरून गोवंशाची आवक आजही नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. शनिवारी मोर्शी मार्गे पायदळ हाकत गोवंश आणले जाते आणि रविवारी चांदूर बाजार कृषी उत्पन्न बाजार समितीत भरत असलेल्या बाजारात त्याची 'कायदेशीर'खरेदी-विक्री दाखवली जाते. कत्तलीसाठी आणलेली जनावरे बाजारात नोंदवून पुढील तपासणीशिवाय पुढे रवाना केली जातात. येथेच संपूर्ण व्यवस्थेतील त्रुटी उघड होतात. बाजार समितीकडून टॅग वैध आहेत की बनावट, याची पडताळणी होत नाही. वाहतूक पोलिसांकडून वाहने थांबवली जातात, मात्र टॅगची कसून तपासणी केली जात नाही. वलगाव मार्गावर उभ्या असलेल्या पोलिस पथकांकडूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

गोवंश संरक्षणासाठी असलेली कायदेशीर तरतूद प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवली जात नसल्याने पशुसंवर्धन विभाग, पोलीस प्रशासन व कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या तिन्ही यंत्रणांमध्ये समन्वयाऐवजी जबाबदारीची चेंडूफेक सुरू असल्याचा संशय व्यक्त होत आहे. जर टॅग तपासण्याची जबाबदारी कोणीच घेत नसेल, तर गोवंश कत्तल थांबवण्याची जबाबदारी कोण घेणार, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या मौनामुळे तस्करांचे धाडस वाढत असून, हा प्रश्न आता केवळ गोवंश संरक्षणापुरता मर्यादित न राहता कायद्याच्या अंमलबजावणीवरच प्रश्न निर्माण करणारा ठरत आहे.

# ग्रामीणमध्येही अमरावती महापालिकेच्या महापौर निवडीची उत्सुकता शिगेला

## थंडीच्या शेकोटीभोवती रंगतात राजकीय अंदाज-तर्कवितर्क

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.24 )** - अमरावती महापालिकेच्या आगामी महापौर निवडीकडे केवळ शहरच नव्हे, तर ग्रामीण भागाचेही लक्ष लागले आहे. सध्या थंडीच्या शेकोटीभोवती बसून केवळ उब घेण्यापुरतीच चर्चा न राहता राजकीय घडामोडींवरही सखोल चर्चा होताना दिसत आहे. महापौरपदी अखेर कोणाची वर्णी लागणार, कोणता पक्ष किंवा आघाडी बाजी मारणार, यावरून ग्रामस्थांमध्ये उत्सुकता वाढली आहे.




महापौरपदासाठी विविध पक्षांतील संभाव्य दावेदारांची नावे चर्चेत असून, त्यांची राजकीय गणिते, संख्याबळ आणि संभाव्य युती यावर तर्कवितर्क लढविले जात आहेत. एमआयएमची भूमिका निर्णायक ठरणार का, शिवसेना किंवा राष्ट्रवादीकडून कोणाला पाठिंबा मिळणार, बहुमतासाठी आवश्यक 'जादूई आकडा' कोण जुळवणार, याबाबत ग्रामीण भागातही चांगलीच चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, अनुभवी व मातब्बर नेत्यांना संधी मिळेल की नव्या चेहऱ्याला 'लॉटरी' लागेल, याबाबतही वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जात आहेत. सत्तासमीकरणे बदलण्याची शक्यता, आघाड्यांमधील अंतर्गत राजकारण आणि शेवटच्या क्षणी होणाऱ्या हालचाली यांवर नागरिक बारकाईने लक्ष ठेवून आहेत. थंडीच्या कडाक्यात शेकोटीभोवती उब घेताना ग्रामीण भागात राजकीय चर्चेचा ताप मात्र तितक्याच जोमाने वाढताना दिसून येत आहे. अमरावती महापालिकेचा महापौर कोण होणार, याची उत्सुकता आता शहराबरोबरच ग्रामीण भागातही शिगेला पोहोचली आहे.

# शालेय विद्यार्थ्यांची द्वारका हायटेक नर्सरीला भेट



## शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शीचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.24 )** - शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी यांच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित व्हावीत, आधुनिक शेतीची माहिती मिळावी आणि उद्योजकतेचा दृष्टिकोन निर्माण व्हावा या उद्देशाने परिसरातील द्वारका हायटेक नर्सरीला शैक्षणिक भेट देण्यात आली. या उपक्रमासाठी इयत्ता नववीतील 32 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. मोर्शी तालुक्यातील प्रफुल्ल हेलोडे यांनी पारंपरिक शेतीपद्धतीला छेद देत नाविन्यपूर्ण प्रयोग, अद्ययावत तंत्रज्ञान आणि स्वत:ची नर्सरी उभारून उल्लेखनीय आर्थिक प्रगती साधली आहे. भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना शेती विकासासाठी सूक्ष्म सिंचन व्यवस्था, आधुनिक पीक पद्धती आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या तीन घटकांचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. प्रयोगशीलता आणि शासकीय योजनांचा योग्य वापर केल्यास शेतीत यशस्वी उद्योजकता कशी निर्माण करता येते, याचे त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणातून मार्गदर्शन केले.

हेलोडे यांनी महाराष्ट्रातील विविध नर्सरींना भेटी देऊन अभ्यास केला व त्यातून स्वत: रोपे तयार करण्याची पद्धत आत्मसात केली. 'आत्मा'मार्फत तळेगाव दाभाडे येथे शेडनेट व पॉलिहाऊस प्रशिक्षण घेऊन त्यांनी मिरची, काकडी, कोबी, टोमॅटो, तसेच टरबूज, खरबूज आदी भाजीपाला रोपांची निर्मिती सुरू केली आहे. ते शेतकऱ्यांना मार्गदर्शनही करतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन कृषी विभागाने त्यांना 'उद्यान पंडित' म्हणून गौरविले आहे. या भेटीदरम्यान उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकूलकर, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, प्रदीप धोटे, सहाय्यक शिक्षक सौरभ राजस तसेच सहाय्यक शिक्षिका स्नेहा ठाकरे व प्राजक्ता जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले.

# एसीबी, लोकायुक्तांना तक्रार करण्याची तयारी?

## ग्रॅच्युइटी प्रकरणात 'अवमान' कारवाईची शक्यता

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** - जिल्हा परिषद अमरावतीतील प्रलंबित ग्रॅच्युइटी प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, न्यायालयाचा अवमान कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे. न्यायालयाचा स्पष्ट आदेश, वसुली प्रमाणपत्र तसेच कोणतीही स्थगिती नसतानाही वयोवृद्ध सेवानिवृत्त कर्मचारी कादर खान सत्तार खान यांना अद्याप ग्रॅच्युइटी व त्यावरील व्याजाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर कादर खान यांनी न्यायालयाचा अवमान, अंमलबजावणी कार्यवाही तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग (एसीबी) आणि लोकायुक्त यांच्याकडे तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे, ग्रॅच्युइटीचा धनादेश काढण्यासाठी 25 हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप झाल्याने हे प्रकरण केवळ प्रशासकीय दिरंगाईपुरते न राहता संभाव्य भ्रष्टाचाराच्या दिशेने वळले आहे.

मी न्यायालयावर विश्वास ठेवला; परंतु न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणीच होत नसेल, तर सामान्य नागरिकाने न्यायासाठी कुठे जायचे? असा सवाल कादर खान यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधण्यात आला; मात्र त्या रजेवर असल्याने प्रतिक्रिया मिळू शकली नाही, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.यासंदर्भात शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांनी सांगितले की, प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य निर्णय घेतला जाईल. ग्रॅच्युइटीसाठी पैशांची मागणी झाल्याचा ठोस पुरावा सादर झाल्यास संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई केली जाईल.

## पालकमंत्र्यांकडून अधिकाऱ्यांची कानउघाडणी

**अमरावती** - जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी)च्या बैठकीत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची चांगलीच कानउघाडणी केल्याची चर्चा रंगली. मंजूर विकासकामांबाबत निधी उपलब्ध असूनही अपेक्षित प्रगती न झाल्याने पालकमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सन 2025-26 अंतर्गत विविध योजनांसाठी मंजूर करण्यात आलेला निधी अद्याप पूर्णपणे खर्च न झाल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित झाला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने पालकमंत्र्यांनी कामातील दिरंगाई, निष्काळजीपणा आणि नियोजनाअभावी विकास रखडत असल्याचे स्पष्ट शब्दांत सुनावले.

# चांदूर रेल्वेच्या मातीतून जागतिक व्यासपीठापर्यंत झेप

- डावोस येथे सागर गिरासेंना 'उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार'
- निलय उद्योग समूहाच्या जागतिक वाटचालीला नवे बळ



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.24 )**- चांदूर रेल्वे तालुक्यातील कारला गावच्या मातीतून घडलेला युवक थेट जागतिक व्यासपीठावर सन्मानित होत असल्याने संपूर्ण तालुक्यासह धामणगाव रेल्वे मतदारसंघासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. निलय उद्योग समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सागर दिलीप गिरासे यांना स्वित्झर्लंडमधील डावोस येथे आयोजित 'आंतरराष्ट्रीय प्रभाव मंच'मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार केवळ वैयक्तिक यशाचे प्रतीक नसून, गिरासे कुटुंबाच्या कष्ट, प्रामाणिकपणा आणि मूल्याधिष्ठित उद्योगसंस्कृतीचा जागतिक स्तरावरील गौरव आहे. मर्यादित साधनसंपत्तीतून उद्योगाची सुरुवात करून सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर सागर गिरासे यांनी निलय उद्योग समूहाला वेगळी ओळख मिळवून दिली. नाशिक येथे मुख्यालय असलेल्या निलय उद्योग समूहाचे शीट मेटल फॅब्रिकेशन, स्विचगियर, इलेक्ट्रिकल पॅनल असेंब्ली आणि इलेक्ट्रो-प्लेटिंग या क्षेत्रांत आठ उत्पादन युनिट्स कार्यरत आहेत. तसेच अमरावती येथे उभारण्यात आलेल्या आधुनिक कोल्ड स्टोरेज व पॅक-हाऊसमुळे केळी, द्राक्षे, मसाले व डाळींची निर्यात सौदी अरेबिया व युरोपसारख्या देशांत होत आहे. डावोस येथील चर्चांमुळे समूहासाठी नव्या गुंतवणूक संधी, प्रगत तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि रोजगारनिर्मितीच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. या यशामुळे कारला गावासह चांदूर रेल्वे तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर उजळले असून सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गोंडवाना विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज अध्यासन समितीवर प्रेमकुमार बोके यांची निवड

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.24 )** - गोंडवाना विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज अध्यासन समितीवर प्रसिद्ध वक्ते, विचारवंत व सामाजिक जाण असलेले व्यक्तिमत्त्व प्रेमकुमार बोके यांची निवड झाल्याबद्दल अंजनगाव शहरात अभिनंदन व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात प्रा. डॉ. सुशील गावंडे प्रदेश सरचिटणीस, किसान सभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गट,अध्यक्ष दर्यापूरअंजनगाव विधानसभा तसेच विद्यमान संचालक, दर्यापूर खरेदी विक्री संस्था, दर्यापूर यांनी मा.श्री. प्रेमकुमार बोके यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले.या वेळी बोलताना प्रा. डॉ. गावंडे म्हणाले की, प्रेमकुमार बोके हे उत्कृष्ट वक्ते, अभ्यासू लेखक तसेच सामाजिक व कौटुंबिक मूल्यांचे प्रभावी भाष्यकार आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण विचारांची समाजाला आज नितांत गरज असून गोंडवाना विद्यापीठासारख्या नामवंत संस्थेत त्यांचे योगदान समाजाला नवी दिशा देणारे ठरेल. प्रेमकुमार बोके यांच्या सामाजिक बांधिलकीमुळे व वैचारिक कार्यामुळे ही निवड गौरवास्पद व प्रेरणादायी असल्याचे मत या वेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या सत्कारप्रसंगी सुयोग खाडे (गटनेता, अंजनगाव नगर परिषद), पत्रकार प्रवीणराव बोके यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी प्रेमकुमार बोके यांना शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक कार्यासाठी शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी यशस्वी भवितव्याच्या कामना केल्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# बस स्थानकावर आरटीओचा प्रश्नमंजुषा उपक्रम

## विजेत्यांना हेल्मेटचे वाटप, प्रवाशांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** - रस्ता सुरक्षा अभियानाच्या अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), अमरावती यांच्या वतीने नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अमरावती मध्यवर्ती बस स्थानक येथे 'रस्ता सुरक्षा चालता बोलता'या उपक्रमाअंतर्गत प्रवाशांसाठी प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा उपक्रम आरटीओ व टीटीआर होंडा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.



प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमास मोटार वाहन निरीक्षक दिनेश एकडे, प्रतीक रोडे, बस स्थानक प्रमुख के. एम. काळे, अक्षय राठोड, टीटीआर होंडाचे जितेंद्र शर्मा, अजय तिवारी तसेच आरटीओचे जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर उपस्थित होते. प्रश्नमंजुषेमध्ये वाहतूक चिन्हांचे अर्थ, हेल्मेट व सीट बेल्ट वापरण्याचे महत्त्व, वेगमर्यादा, अपघात टाळण्यासाठी घ्यावयाच्या खबरदाऱ्या यासंबंधी प्रश्न विचारण्यात आले.

तीन प्रश्नांपैकी किमान दोन प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या प्रवाशांना प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून हेल्मेटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात सृष्टी बावणे, शेख आजम, अभिजीत शेट्टी, मंगेश पारिसे, प्रणव मोकळे, लखन पवार व गौरव शिंदे यांचा विशेष सहभाग होता. तसेच इतर प्रवाशांना वाहतूक नियमांची माहिती देणारी पॅम्पलेट वाटप करण्यात आली. या उपक्रमामुळे सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतुकीस चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## माधवराव वाट यांचे निधन



हिवरखेड-येथील माजी सैनिक तथा प्रतिष्ठित नागरिक माधवराव वाट यांचे दिनांक 19 जानेवारी 2026 ला वयाच्या (92) व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांवर निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे दोन मुले, दोन सुना, एक मुलगी, जावई नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# घुईखेडच्या जंगी शंकरपटाला प्रशासनाची हिरवी झेंडी

**27 व 28 जानेवारीला बैलगाडा शर्यतींचा थरार**

**2 लाख 85 हजार रुपयांची बक्षिसे**



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.24 )** - जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या व चांदूर रेल्वे तालुक्यातील दरवर्षी एकमेव पारंपरिक शंकरपटाला अखेर प्रशासनाकडून हिरवी झेंडी मिळाली आहे. बेंडोजी बाबा संस्थान व गावकरी मंडळ, घुईखेड यांच्या संयुक्त विद्यमाने 27 व 28 जानेवारी रोजी भव्यदिव्य जंगी शंकरपट व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतीत एकूण 2 लाख 85 हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आल्याने जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील बैलगाडी मालक व शर्यतप्रेमींचे लक्ष या स्पर्धेकडे वेधले गेले आहे.

मंगळवार, 27 जानेवारी रोजी सकाळी 10.30 वाजता घुईखेड येथील बेंडोजी बाबा एम.सी.व्ही.सी. महाविद्यालयाच्या मागील मैदानावर शंकरपटाला सुरुवात होणार आहे. स्पर्धा अ गट व क गट अशा दोन गटांत पार पडणार असून दोन्ही गटांसाठी मानाची व आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. अ गटात प्रथम बक्षीस 51 हजार रुपये तर क गटात प्रथम बक्षीस 31 हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गटात अकरा क्रमांकांपर्यंत विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे.

या जंगी शंकरपटाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने स्पर्धक, शौकीन व भाविकांची उपस्थिती राहणार असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यात्रा महोत्सवांतर्गत धार्मिक विधी, पूजन, तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिस्तबद्ध व सुरक्षित वातावरणात शर्यती पार पडाव्यात, यासाठी आयोजकांनी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधांची तयारी केली आहे. या जंगी शंकरपटाचा व यात्रा महोत्सवाचा लाभ परिसरातील तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन श्री. बेंडोजी बाबा संस्थान, शंकरपट समिती, व्यवस्थापन समिती व घुईखेड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मापात पाप! ग्रामीण आठवडी बाजारात वजनमापातून ग्राहकांची लूट

## वैध मापन विभागाच्या दुर्लक्षामुळे खोट्या काटा-तराजूंचा सुळसुळाट

**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट,( दि.24 )** - अचलपूर व अंजनगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील आठवडी बाजारात वजनमापातील घोटाळे खुलेआम सुरू असून, ग्राहकांची सर्रास फसवणूक होत आहे. ठरलेल्या दराने पैसे मोजूनही बहुतांश वेळा योग्य वजनाचा माल मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. व्यापारी वापरत असलेले काटे, तराजू आणि वजनमापेच चुकीची असल्याने हा गैरप्रकार सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



अनेक व्यापारी वजनासाठी अधिकृत मापांऐवजी दगड, गोटे किंवा छेडछाड केलेली वजनमापे वापरत असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी तराजूचे पारडे कमी-जास्त वजनाचे असून, काही काट्यांना अचूक मापनासाठी आवश्यक असलेली काटेच नसतात. विस ग्रॅम, पन्नास ग्रॅमसारखी लहान वजनमापे नसल्यामुळे अर्धा पाव वस्तू घेतल्यास थेट शंभर ग्रॅमचाच माल दिला जातो. यामुळे ग्राहकांचे आर्थिक नुकसान होत आहे.

पूर्वी वैध मापन विभाग दर तीन महिन्यांनी बाजारात तपासणी करीत असे. त्या काळात व्यापाऱ्यांमध्ये धाकधूक निर्माण होत होती. चुकीचे काटे व वजनमाप आढळल्यास जप्तीची कारवाईही केली जात होती. मात्र, सध्या या विभागाची सक्रियता कमी झाल्याने व्यापाऱ्यांचे धाडस वाढले आहे. काही ठिकाणी इलेक्ट्रॉनिक काट्यांमध्येही छेडछाड केल्याच्या तक्रारी आहेत.

### धाडी टाकून कठोर कारवाई करा!

याप्रकाराचा सर्वाधिक फटका सामान्य ग्राहक आणि शेतकऱ्यांना बसत आहे. शेतकऱ्यांचा भाजीपाला कवडीमोल भावात खरेदी करून तोच माल ग्राहकांना चढ्या दराने आणि कमी वजनाने विकला जात असल्याचा आरोप आहे. त्यामुळे दुहेरी लूट होत आहे. ग्रामीण आठवडी बाजार हे जनतेच्या दैनंदिन गरजांचे प्रमुख केंद्र आहेत. त्यामुळे वैध मापन विभागाने तातडीने धाडी टाकून कठोर कारवाई करावी, दोषी व्यापाऱ्यांवर दंड व जप्तीची कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्राहक, शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. यामुळेच 'मापात पाप' या प्रकाराला आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

